सामाईकरित्या (विभागून) तृतीय क्रमांक घोषित केलेल्या संघातील खेळाडूंना ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भातील सूचना...

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८(भाग-१)/क्रीयुसे-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२३

वाचा-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ , दिनांक ०१ जुलै,२०१६.
२. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक १७ मार्च, २०१७.
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक २७ मार्च, २०१७.
५. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७.
६. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर,२०१७.
७. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १६ नोव्हेंबर,२०१७.
८. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च,२०१९
९. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर,२०१९
१०. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून,२०२२

**प्रस्तावना:-**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबतचे सुधारीत धोरण संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०१ जुलै,२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहीत केले आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने उपरोक्त इतर शासन निर्णयांन्वये वेळोवेळी सुधारणा/सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तर स्पर्धामध्ये तृतीय क्रमांक देण्याच्या तरतूदी वेगवेगळ्या खेळांत भिन्न असल्याचे दिसून येते. यामध्ये काही

खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये एकच तृतीय क्रमांक दिला जातो, तर त्याच खेळामध्ये राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर दोन तृतीय क्रमांक दिले जातात. त्यामुळे काही सांघिक खेळांमध्ये सामाईकरित्या (विभागून) तृतीय क्रमांक दिलेल्या खेळाडूंना ५ टक्के आरक्षणासाठी पात्र ठरविण्यात येत आहे तर काही सांघिक खेळात सामाईकरित्या तृतीय क्रमांक दिला जात नसल्याने, सदर खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरत नाहीत. तसेच केवळ खेळाडू आरक्षणाचे लाभ मिळवण्यासाठी सद्यस्थितीत काही राष्ट्रीय व राज्य क्रीडा संघटनांमार्फत त्यांच्यास्तरावर तृतीय क्रमांक सामाईकरित्या/विभागून देण्याची कार्यवाही करीत असल्याचे शासनास आढळून आले आहे. सदरची बाब वैयक्तिक क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवून खेळाडू आरक्षणातून नोकरीसाठी स्पर्धा करणाऱ्या उमेदवारांवर अन्यायकारक आहे. त्यामुळे आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक विभागून देण्यात येत असलेल्या संघातील खेळाडूंना आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय करण्यासाठी स्पष्ट निर्णय देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

ज्या खेळ प्रकारांमध्ये तृतीय क्रमांक विभागून/सामाईकरित्या दिला जातो, अशा तृतीय क्रमांक प्राप्त खेळाडूंच्या प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात खालील नमूद सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे-

ऑलिम्पिक गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स, एशियन गेम्स, जागतिक क्रीडा स्पर्धा व एशियन चॅम्पियनशीप या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील ज्या खेळांमध्ये तृतीय क्रमांक दोन संघांना विभागून देण्याची तरतूद असेल, त्याच खेळाच्या राष्ट्रीय व राज्यस्तर स्पर्धेत, विभागून दिलेल्या तृतीय क्रमांक धारक खेळाडू उमेदवारांना ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत. या तरतूदी व्यतिरीक्त इतर खेळ संघटनांमार्फ़त घोषित तृतीय क्रमांक धारक उमेदवारांना ५ टक्के आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय करण्यात येऊ नयेत.

२. सदरची तरतूद सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर पार पडणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तर क्रीडा स्पर्धांना लागू राहील.

३. शासनाचे उपरोक्त निर्देश सर्व संबंधित क्रीडा संघटनांच्या तात्काळ निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३१०१८१७४३०३५४२१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DNYANESHWAR ASARAJI AVHAD

Digitally signed by DNYANESHWAR ASARAJI AVHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=190ce31a764c50caee9a11b81ac560fc0d85bb0ebc377f46c4fc0040aae47135, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=05AE42076719D0FCE5DC8ACF3A44FBA50819DD0D088B25A2D0D7CDE0256A48B0, cn=DNYANESHWAR ASARAJI AVHAD
Date: 2023.10.18 17:46:11 +05'30'

**( ज्ञानेश्वर आव्हाड )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
४) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), पुणे
६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८) लोकायुक्त, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई,
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ ९लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२) सर्व मंत्रालयीन विभाग,
१३) सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय/विभाग प्रमुख
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५) सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद
१६) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई
१८) निवड नस्ती, क्रीयुसे-२